MHST180018782025 **नियमित दिवाणी दावा क्र. २७६/२०२५**

निशाणी क्रमांक – ५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. **दावा मिळकतीचे वर्णन** :–

मौजे–निमसोड, ता. खटाव, जि. सातारा येथील नगर भूमापन क्र. १०१०, क्षेत्र ८३.५० चौ. मी. यामधील दक्षिण बाजूकडील वादीचा २०.८७ चौ.मी. चा हिस्सा त्याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. २४३ यामध्ये माळवद साडेतीन खण १० x १८ त्यास लागून २३ x ३० = ६९० चौ. फूट दगड, मातीची पत्रा असलेली पूर्वाभिमुखी इमारत व सदर मिळकतीच्या पूर्व बाजूस उत्तरेकडून दक्षिणेकडे असलेला ९ फूटाचा बोळ या मिळकती या प्रकरणातील वाद विषय आहेत. (सोईसाठी यापुढे सदर मिळकतींना ''दावा मिळकत व वाद रस्ता '' असे संबोधले आहे.)

३. वादी यांचे कथन असे की, नगर भूमापन क्र. १०१० ही मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलार्जित मिळकत आहे. सदर मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचे पूर्वजांमध्ये दिनांक १९.१०.१९७९ रोजी सरसनिरसमानाने वाटप झाले. सदर वाटपानुसार नगर भूमापन क्र. १०१० मध्ये पूर्व–पश्चिम असे चार हिस्से पाडले व दक्षिण बाजूकडील १/४ हिस्सा वादी व प्रतिवादी क्र. ६ व ७ यांचे वडीलांचे हिश्श्यास देण्यात

आला. त्यामध्ये, त्यांनी सन १९८९ साली घर बांधले. वादीचे उत्तर बाजूस प्रतिवादी क्र. १ यांचे वडीलांचा हिस्सा आहे व त्यांचे उत्तरेस प्रतिवादी क्र. २ चे पती व त्यांच्या उत्तरेस प्रतिवादी क्र. ५ चे पती यांचे हिस्से आहेत. त्यानुसार, प्रत्येकाच्या स्वतंत्र कब्जे वहिवाटी आहेत. वाटपाचे वेळी नगर भूमापन क्र. १०१० चे पूर्व बाजूस दक्षिण–उत्तर असा बोळ वजा रस्ता सोडलेला आहे. सदर रस्त्याचा कच्चा नकाशा दाव्यासोबत जोडला आहे व त्यामध्ये ABCD या अक्षराने वाद रस्ता दर्शविला आहे. सदर बोळ रस्त्यावरुन नगर भूमापन क्र. १००९ या देशमुख भाऊकीच्या समाईक मिळकतीतून प्रतिवादी क्र. ५ चे हिश्श्याचे उत्तर बाजूस वळसा मारुन निमसोड गावठाणातील मुख्य रस्त्यावर जाणे–येणेकरिता प्रत्येक जण वाद रस्त्याचा उपभोग घेत आहे व सुखाचाराचा हक्क बजावत आहेत.

४. वादीचे कथन पुढे असे आहे की, अरविंद व्यंकटराव देशमुख यांचे नाव नगर भूमापन क्र. १०१० ला लागलेले आहे. परंतु, त्यांना नगर भूमापन क्र. १००९ ही मिळकत वाटपाने दिली आहे. त्यामुळे नगर भूमापन क्र. १०१० चे अभिलेखास त्यांचे नावाची पोकळ नोंद आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी नवीन घराचे बांधकाम चालू केले असून वाद रस्त्यावर ते बांधकाम करत आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी वाद रस्त्यावर ३ फूटाचे अतिक्रमण करण्याचे उद्देशाने खड्डे खोदायला सुरुवात केली व ते तळमजल्यावर रस्त्याच्या बाजूने बाल्कनी काढणार आहेत. वादींनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी दांडगाव्याची भाषा केली. प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांच्या सुखाचाराच्या हक्कास अडथळा केला आहे. वादी यांना सकृतदर्शनी केस असून न्यायाचा तराजू वादीचे यांचे लाभात आहे. जर, तुर्तातुर्त मनाई दिली नाही तर वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, वादींनी अर्ज मंजूर करावी अशी वादींनी केल आहे.

५.   प्रतिवादी क्रमांक १ यांनी निशाणी क्र. २२ कडे त्यांचे म्हणणे सादर केले व त्यांनी अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांना त्रास देण्याच्या कुटील हेतूने व त्यांचे बांधकाम बंद पाडण्याच्या हेतूने प्रस्तुतचा खोटा दावा व खोटा अर्ज दाखल केला आहे. दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे व न्यायालयाची दिशाभूल करणारे आहे. वादी यांनी त्यांचे हिश्श्याचे क्षेत्र २०.८७ चौ.मी. आहे असे दाव्यात नमूद केले आहे. परंतु, वादी यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र. २४३ चे क्षेत्र ६९० चौ.फूट आहे असे दाव्यात नमूद आहे. त्यामुळे, दाव्यातील सदर विधाने परस्पर विरोधी आहेत. सदर कथनांवरुन वादी यांनी दावा मिळकतींमध्ये त्यांचे प्रत्यक्ष हिश्श्यापेक्षा जास्त क्षेत्रामध्ये बांधकाम केल्याचे दिसून येते. दावा मिळकतीच्या पूर्व बाजूस ९ फूटाचा वाद रस्ता आहे व प्रतिवादी क्र. १ त्या रस्त्यावर अतिक्रमण करुन बांधकाम करत आहेत हा मजकूर खोटा व लबाडीचा आहे. वाद रस्त्याची रुंदी ९ फूट कधीही नव्हती व प्रतिवादी क्र. १ यांनी वाद रस्त्यावर अतिक्रमण करुन बांधकाम केलेले नाही. वाद रस्ता नगर भूमापन क्र. १०१० च्या एकत्रित नकाशामध्ये दिसून येत नाही. तसेच, वादींनी सदर वाद रस्त्याबाबत कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. वादींनी दाव्यासोबत काल्पनिक नकाशा जोडला आहे.

६.   प्रतिवादी क्र. १ यांचे कथन पुढे असे आहे की, दाव्यामध्ये वाटपाबाबत नमूद केलेला सर्व मजकूर खोटा, लबाडीचा व संदिग्ध स्वरुपाचा आहे. वादी, प्रतिवादी व अरविंद देशमुख यांची दावा मिळकतीमध्ये तसेच त्यालगत असलेल्या नगर भूमापन क्र. १०१६, १०१४ व १००९ मध्ये स्वतंत्र कब्जेवहिवाट असून त्यामध्ये त्यांनी स्वतंत्र राहती घरे बांधली आहेत. वादी हे प्रतिवादी क्र. १ यांचे चुलत भाऊ आहेत. प्रतिवादी क्र. १ यांचे दावा मिळकत व नगर भूमापन क्र. १००९ मध्ये राहते घर असून त्याचा ग्रामपंचायत क्र. २४५ असा आहे. ग्रामपंचायत मिळकत क्र. २४५ ला लागून पश्चिम

बाजूस ग्रामपंचायत मिळकत क्र. २४९ ही गणेशरोड नामक समाईक खुली जागा असून सदर जागेचा वापर वादी व प्रतिवादी हे पूर्वापारपणे जाणे–येणेकरिता करत होते व आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी सुध्दा त्यांचे घर मिळकतीचे पूर्व बाजूस साधारणत ५ ते ६ फूट जागा सोडलेली आहे. तसेच, प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनीदेखील त्यांचे राहते घराचे पूर्वेस ५ ते ६ फूट जागा सोडलेली आहे. वादी यांनीच जाणीवपूर्वक त्यांचे घराचे बांधकाम करताना कोणतीही जागा न सोडता पूर्व बाजूस संडास व बाथरुमचे बांधकाम केलेले आहे. त्यामुळे, नगर भूमापन क्र. १००९ मध्ये दक्षिण बाजूकडून जाणेकरिता केवळ २ फूटाचा बोळच शिल्लक राहिलेला आहे. वादींनी सदर परिस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवली आहे व ते स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत. वादी यांनी दावा मिळकतीमधील अरविंद देशमुख यांचे हिश्श्याचे क्षेत्र नमूद केलेले नाही. अरविंद देशमुख यांना नगर भूमापन क्र. १००९ मधील हिस्सा देण्यात आला व नगर भूमापन क्र. १०१० चे अभिलेखास त्यांचे नावाची पोकळ नोंद आहे हे कथन काल्पनिक आहे. नगर भूमापन क्र. १००९ चे अभिलेखास अरविंद देशमुख यांचे नावाची नोंद नाही. सदर मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. नगर भूमापन क्र. १०१० चे एकूण क्षेत्र ८९८.७८ चौ. फूट आहे. वादी, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे ग्रामपंचायत मिळकत क्र. २४३, २४५ व २४२ मधील बांधकामाचे क्षेत्र पाहिले असता वादी, प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या वर नमूद मिळकती नगर भूमापन क्र. १०१० चा भाग असणे तांत्रिक व गणितीय दृष्टया केवळ अशक्य आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे घराचे बांधकाम बंद पाडण्यासाठी खोटा दावा व खोटा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी वादीच्या सुखाचाराचे हक्काचे कधीही उल्लंघन केलेले नव्हते व नाही. वादींनी सर्व सहहिस्सेदारांना पक्षकार केले नसल्यामुळे दाव्यास आवश्यक पक्षकार न केल्याची बाधा येते. प्रतिवादी क्र. १ यांनी घराचे बांधकामासाठी रक्कम रुपये ७,५०,०००/– खर्च केले आहेत व बांधकामासाठी लागणारे साहित्य

जागेवर आणून ठेवले आहे. जर, तुर्तातुर्त मनाई आदेश दिला तर प्रतिवादी क्र. १ यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. दाव्यामध्ये व अर्जामध्ये कोणतेही तथ्य नाही. न्यायाचा तराजू प्रतिवादी क्र. १ यांचे बाजूने आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

७. वादी यांनी नि. क्र. ३ व १३ सोबत तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी नि.क्र. २५ व ३१ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

८. वादी व प्रतिवादी क्र. १ यांचेतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

९. प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित झालेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

अ.क्रं.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	वादी यांच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ?	**होकारार्थी.**
२.	न्यायाचा तराजू वादी यांचे बाजुने आहे काय	**होकारार्थी.**
३.	जर तुर्तातुर्त मनाई हुकूम पारीत केला नाही तर, वादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय ?	**होकारार्थी.**
४.	आदेश काय ?	**अंतिम आदेशाप्रमाणे**

– का र ण मि मां सा –

मुद्दा क्र.१ ते ३ करिता :–

१०. वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळणेसाठी सदर मुद्दे एकत्रित चर्चेसाठी घेतलेले आहेत.

११. वादी यांचेतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलार्जित मिळकत आहे. सदर मिळकतीचे दिनांक १९.१०.१९७९ रोजी सरस–निरसमानाने वाटप झाले असून त्यामध्ये पूर्व–पश्चिम असे चार हिस्से पाडलेले आहेत. वादी व प्रतिवादी क्र. ६ व ७ यांचे वडील रामचंद्र यांचे हिश्श्यास दक्षिण बाजूकडील १/४ हिस्सा मिळाला. वादी यांचे उत्तर बाजूकडील हिस्सा प्रतिवादी क्र. १ यांचे वडील भिमराव यांना मिळाला. भिमराव यांचे उत्तरेबाजूकडील हिस्सा प्रतिवादी क्र. २ यांचे पती भानुदास यांना मिळाला व त्यांचे हिश्श्याचे उत्तरेस प्रतिवादी क्र. ५ यांचे पती कृष्णराव यांना हिस्सा मिळाला. सदर वाटपानुसार वादी व प्रतिवादी यांच्या दावा मिळकतीमध्ये स्वतंत्र कब्जे वहिवाटी आहेत. वाटपाचे वेळी दावा मिळकतीचे पूर्व बाजूस दक्षिण–उत्तर असा ९ फूट रुंद बोळ वजा रस्ता म्हणजेच वाद रस्ता ठेवलेला आहे. वादी हे सदर रस्त्याचे सुखाचाराचा हक्क वाटपापासून विना अडथळा उपभोगत आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे घराचे बांधकाम करताना वाद रस्त्यावर बांधकाम करणेस सुरुवात केली आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी बांधकाम पूर्ण केलेस वादींचा वाद रस्त्यावरील सुखाचाराचा हक्क संपुष्टात येऊ शकतो. सबब, प्रथमदर्शनी केस व न्यायाचा तराजू वादींचे बाजूने आहे. जर, तुर्तातुर्त मनाई दिली नाही व दरम्यानचे काळात प्रतिवादी क्र. १ यांनी बांधकाम पूर्ण केलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे, त्यांनी अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

१२. याउलट, प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे व न्यायालयाची दिशाभूल करणारे आहे. संपूर्ण दावा मिळकतीचे क्षेत्र ८३.५० चौ.मी. इतके असून त्यामध्ये वादींचे क्षेत्र २०.८७ चौ. मी. असल्याचे वादींनीच कथन केले आहे. वादी यांची ग्रामपंचायत मिळकत क्र. २४३ अशी असून त्याचे क्षेत्र ६९० चौ. फूट आहे असे वादींनी कथन केले आहे. सदर कथनांवरुन वादी यांनी त्यांना प्राप्त होणा–या हिश्श्यापेक्षा जास्त क्षेत्रामध्ये बांधकाम केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. वाद रस्ता म्हणजेच ९ फूट रुंदीचा बोळ वजा रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही, तसेच त्यावर प्रतिवादी क्र. १ यांनी अतिक्रमण करुन कोणतेही बांधकाम केलेले नाही. वादी कथन करतात तसा कोणताही रस्ता दावा मिळकतीचे नकाशामध्ये दिसून येत नाही. वादींनी दाव्यासोबत दाखल केलेला नकाशा काल्पनिक आहे. वादी यांनी जाणीवपूर्वक त्यांचे घराचे बांधकाम करताना कोणतीही जागा न सोडता पूर्व बाजूस संडास–बाथरुमचे बांधकाम केले आहे. त्यामुळे, नगर भूमापन क्र. १००९ मध्ये दक्षिण बाजूकडून जाणेकरिता वादीचे घरास लागून केवळ २ फूटाचा बोळ शिल्लक राहिलेला आहे. अरविंद देशमुख यांना नगर भूमापन क्र. १००९ मधील हिस्सा वाटपाने देण्यात आला व दावा मिळकतीचे मालमत्ता पत्रकावर त्यांचे पोकळ नाव राहून गेले आहे असे वादींचे कथन आहे. परंतु, नगर भूमापन क्र. १००९ चे मालमत्ता पत्रक पाहिले असता त्यामध्ये अरविंद देशमुख यांचे नावाची नोंद नाही. दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र ८९८.७८ चौ. फूट आहे. वादी यांची ग्रामपंचायत मिळकत क्र. २४३ मध्ये असणारे घर मिळकतीचे क्षेत्र ८७० चौ. फूट आहे. प्रतिवादी क्र. १ यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र. २४५ चे क्षेत्र २९० चौ. फूट व प्रतिवादी क्र. २ यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र. २४२ चे क्षेत्र ३९४ चौ.फूट आहे. दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र व ग्रामपंचायत मिळकत क्र. २४२, २४३ व २४५ मधील वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे घर मिळकतींचे क्षेत्र पाहिले असता सदर ग्रामपंचायत मिळकती या नगर भूमापन क्र. १०१० म्हणजेच दावा मिळकतीचा

भाग असणे तांत्रिक व गणितीय दृष्टया अशक्य आहे. वादी यांनी सर्व वस्तुस्थिती न्यायालयासमोर आणलेली नाही व ते स्वच्छ हाताने न्यायालयात आलेले नाहीत. त्यामुळे, मनाई सारखा विवेकाधिन आदेश मिळणेस वादी पात्र नाहीत. प्रथमदर्शनी केस व न्यायाचा तराजू वादींच्या बाजूने नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी बांधकामासाठी रक्कम रुपये ७,५०,०००/– खर्च केला आहे. सध्या एकतर्फा मनाई आदेशामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे बांधकाम बंद स्थितीत आहे. अशा परिस्थितीत तुर्तातुर्त मनाई आदेश झाला तर प्रतिवादी क्र. १ यांचे बांधकाम बंद पडून त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

१३. वादी यांनी नगर भूमापन क्र. १०१० चे मालमत्ता पत्रक निशाणी क्र. ८ कडे दाखल केले आहे. सदर मालमत्ता पत्रकामध्ये वादी यांचे वडील रामचंद्र, प्रतिवादी क्र. १ यांचे वडील भिमराव, प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे पूर्वज भानुदास व प्रतिवादी क्र. ५ यांचे नाव नमूद असल्याचे दिसून येते. दावा मिळकतीचे मालमत्ता पत्रकावर अरविंद देशमुख यांचे नाव नमूद आहे. त्यांना दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे किंवा नाही हा या क्षणी वादाचा मुद्दा नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ यांचे म्हणणेमधील त्याबाबतची हरकत विचारात घेण्याचे कोणतेही कारण नाही.

१४. ग्रामपंचायत मिळकत क्र. २४३, २४५ व २४२ चे उतारे अनुक्रमे निशाणी क्र. ९ ते ११ पाहिले असता, दावा मिळकतीमध्ये वादी, प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. २ यांची घरे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादी यांनी निशाणी क्र. ३/६ व ३/७ कडे वाद रस्ता व वादी व प्रतिवादी यांचे घरांचे दोन फोटो याकामी दाखल केले आहेत. सदर फोटोमध्ये प्रतिवादी क्र. १ यांचे घराचे बांधकाम दिसत असून सदर बांधकामाचे पूर्वेस छोटा बोळ दिसत असल्याचे व बांधकामाचे आजूबाजूला

म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे घराचे पूर्वेस मोठा बोळ असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. १ यांचे बांधकाम हे वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्या मिळकतीच्या दरम्यान आहे. वादी यांनी तसा वस्तुस्थितीचा कच्चा हात नकाशा दाव्यासोबत जोडला आहे. सदर नकाशावरुन तसेच फोटो निशाणी क्र. ३/६ व ३/७ वरुन प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे घराचे पूर्व बाजूस असलेल्या बोळावर बांधकाम सुरु केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी क्र. १ यांनी या प्रकरणात दाखल केलेल्या निशाणी क्र. २५/४ कडील ६ फोटोंवरुन सुध्दा प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे घराचे पूर्व बाजूकडील बोळ वजा रस्त्यावर बांधकाम केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१५. प्रतिवादी क्र. १ यांची हरकत अशी आहे की, वादी यांनी सुध्दा त्यांचे घराचे पूर्व बाजूस संडास–बाथरुमचे बांधकाम केले असून तेथे फक्त २ फूटाचा बोळ शिल्लक राहिलेला आहे. परंतु, दाव्यासोबत दाखल केलेल्या कच्चा हातनकाशा व याकामी दोन्ही बाजूंनी दाखल केलेले फोटो पाहिले असता प्रतिवादी क्र. १ यांच्या बांधकामाच्या दक्षिण बाजूस वादी यांचे घर असल्याचे व वादी यांचे घराचे पूर्व बाजूस मोठा बोळ असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. दोन्ही बाजूंनी या कामी दाखल केलेल्या फोटोवरुन दावा मिळकतीचे शेवटचे टोकास दक्षिण बाजूस वादी यांचे संडास–बाथरुमचे बांधकाम दिसत असले तरी वादी यांचे घराचे पूर्व बाजूस मोठा बोळ दिसत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र. १ यांचे बांधकामाचे उत्तर बाजूस पूर्वेकडून मोठा बोळ वजा रस्ता म्हणजेच वाद रस्ता आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ यांना वादी यांचे घराकडे जाण्याचे कोणतेही कारण नाही. क्षणभर, वादी यांचे संडास–बाथरुमचे बांधकाम बोळ रस्त्यावर म्हणजेच वाद रस्त्यावर आहे असे गृहित धरले तरी, प्रतिवादी क्र. १ यांना त्याबाबत योग्य ती कायदेशीर दाद मागता येऊ शकते. त्यामुळे, याक्षणी प्रतिवादी क्र. १ यांचे वर नमूद हरकतींमध्ये तथ्य दिसून येत नाही.

१६. वर नमूद सर्व स्पष्टीकरण लक्षात घेता, वादी यांनी त्यांचे वापरासाठी वाद रस्ता अस्तित्वात असल्याचे व प्रतिवादी क्र. १ यांनी सदर वाद रस्त्यावर बांधकाम सुरु केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे. सबब, प्रथमदर्शनी केस व न्यायाचा तराजू वादी यांचे बाजूने असल्याचे सिध्द होते. जर तुर्तातुर्त मनाई आदेश केला नाही तर, प्रतिवादी क्र. १ हे वाद रस्त्यावर सुरु असलेले त्यांचे बांधकाम पूर्ण करतील व त्यामुळे वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, मी मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष 'होकारार्थी' देत आहे.

मुद्दा क्रमांक ४ बाबत :–

१७. वर नमूद सर्व स्पष्टीकरण लक्षात घेता, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्रं.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आ दे श	
१.	अर्ज नि.क्र. ५ मंजूर करण्यात येतो.
२.	प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्रमांक १ यांनी दाव्यासोबतच्या कच्च्या हात नकाशामध्ये ABCD या अक्षराने दाखवलेल्या वाद रस्त्यावर बांधकाम करु नये अशी प्रतिवादी क्र . १ यांना तुर्तातूर्त मनाई देण्यात येते.
३.	प्रस्तुत अर्जाचे खर्चाबाबतचा विचार अंतिम आदेशाच्यावेळी करण्यात येईल.

वडूज.   (डी.एम.जी.मलिदवाले)

दि. १७/०७/२०२६   **२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वडूज.**